ागतिक बँक अर्थसहाय्यीत
# महाराष्ट्र स्पर्धाक्षम कृषि विकास प्रकल्प
सहकार व पणन विभाग, महाराष्ट्र शासन
प्रकल्प अंमलबजावणी कार्यालय - कृषि
प्लॅट नं. एफ/ई/७८, पहिला मजला, भु -विकास बॅंकेचे प्रशिक्षण केंद्र, मार्केट यार्ड, गुलटेकडी, पुणे - ४११०३७
दूरध्वनी ०२०-२४२७०३१५/१६, फॅक्स ०२०-२४२७०३२२, ई-मेल- macp2009@ymail.com

जा.क्रं. एम.ए.सी.पी/पीआययु (कृषि) /पर्यावरण/मार्गदर्शक सूचना /२०६/२०११ दिनांक: १७/०९/२०११

## पर्यावरण व्यवस्थापन कृती आराखडा
## मार्गदर्शक सूचना

### १.० प्रस्तावना

जागतिक बैंकेच्या सहाय्याने राज्यात महाराष्ट्र स्पर्धाक्षम कृषि विकास प्रकल्प राबविणेत येत आहे. जागतिक बँकेचे प्रकल्प राबवित असताना या प्रकल्पामुळे पर्यावरणाची हानी होऊ नये यासाठी जागतिक बँक विशेष काळजी घेते. हा प्रकल्प मंजुर करण्यापुर्वी बॅंकेत या प्रकल्पाचाही पर्यावरण विषयक अभ्यास केला, आणि त्याबाबतचा अहवाल Integrated Environment and Social Assessment (IESA) या शिर्षकाने प्रसिद्ध केला. या अहवाला नुसार पर्यावरण आणि सामाजिक व्यवस्थापनासाठी एक आराखडा निश्चित करण्यात आला आहे. हा आराखडा Environment and Social Management Framework (ESMF) या शिर्षकाने प्रसिद्ध करण्यात आला आहे.

उपरोक्त ESMF नुसार प्रकल्पातुन पर्यावरण संरक्षणासाठी एकात्मीक अन्नद्रव्य व्यवस्थापन आणि किडरोग व्यवस्थापन (INM-IPM Demonstration) राबवावयाची आहेत.

### २.० एकात्मीक अन्नद्रव्य व्यवस्थापन आणि किडरोग व्यवस्थापन

**गावांची निवड:** MACP अंतर्गत ज्यागावात कृषि विस्तार लघु प्रकल्प राबविणेत येत आहे. त्याच गावात ही प्रत्याक्षिके लघु प्रकल्पाचाच एक भाग म्हणून राबविणेत यावीत.

प्रत्याक्षिकांमध्ये राबवावयाच्या बाबी पुढील प्रमाणे (IPM-INM Demonstration)

| अ.क्र. | बाब | एकक | प्रति प्रात्यक्षिक रक्कम (रुपये) | राबविण्याच्या बाबीं | |
|---|---|---|---|---|---|
| | | | | भौतिक | आर्थिक (रुपये) |
| १) | माती परीक्षण (विशेष माती तपासणी करुन मूलद्रव्य तपासणी) | संख्या | ४५० | १० | ४,५०० |
| २) | माती परीक्षणावर आधारीत सुक्ष्ममुलद्रव्ये | एकर | ४०० | १०० | ४०,००० |
| ३) | बीज प्रक्रिया (जीवाणू खते आणि रोगप्रतिबंधक औषधे) | एकर | ४० | १०० | ४,००० |
| ४) | शिफारशी नुसार सापळा पिकाची लागवड | एकर | २५ | १०० | २,५०० |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| ५) | पक्षी थांबे (लाकडी अँटेना, उंच ज्वारीचे तुरळक मिश्रपिक) | एकर | २५ | १०० | २,५०० |
| ६) | निमार्क किंवा अँझाडीरेक्टेरीनची फवारणी | एकर | २०० | १०० | २०,००० |
| ७) | शेतकरी प्रशिक्षण | संख्या | १ | १ | ५,००० |
| ८) | आकस्मीक खर्च (बोर्ड व इ. खर्च) | | | | २,००० |
| | | | | एकूण | **८०,५००** |

उपरेक्त मापदंड अधिकत्तम असून प्रत्यक्षात पिकनिहाय शिफारशीनुसार मात्रा वापराव्यात प्रत्यक्ष अनुदान वरील अधिकत्तम मापदंडाच्या मर्यादेत द्यावे. शिफारशीनूसार लागणा-या मात्रासाठी वरील अधिकत्तम मापदंडापेक्षा अधिक अनुदान लागल्यास त्यासाठी लाभार्थी हिस्सा द्यावा.

नमुद केल्याप्रमाणे ही प्रात्यक्षिके लघु कृषि विस्तार प्रकल्प तत्वावर राबवावित विस्तार प्रकल्प तयार करण्यासाठी प्रकल्पाच्या मार्गदर्शक सुचनामधील प्रपत्राचा वापर करावा. घटक निहाय मार्गदर्शक सुचना पुढील प्रमाणे :

१) **माती परीक्षण :** (विशेष माती तपासणी सुक्ष्म मुलद्रव्यासह) क्लस्टर प्रद्धतीने राबविणेत येणा-या या प्रात्याक्षिकाचे क्षेत्र साधारणातः १०० एकर इतके असेल. प्रत्येक १० एकरामागे एक याप्रमाणे संपुर्ण १०० एकर क्षेत्राचे प्रतिनिधीत्व करणारे १० माती नमुने हंगामापुर्वी तपासुन घ्यावेत. प्रत्याक्षिक खरीप हंगामात राबवावयाचे झाल्यास माती नमुने एप्रिल महिन्यात काढावेत आणि मे महिन्यात तपासणी अहवाल प्राप्त व्हावेत. प्रात्याक्षिक रब्बी हंगामात घ्यावयाचे असल्यास खरीपाच्या पेरणीपुर्वी जुन महिन्यात माती नमुने काढुन त्याबाबतचे अहवाल ऑगस्ट महिन्यात प्राप्त व्हावेत. याबाबत संपुर्ण नियोजन आणि पाठपुरावा संबंधीत मंडळकृषि अधिकारी यांनी करावा.

माती नमुन्यांचे अहवाल प्राप्त झाल्यानंतर प्रात्याक्षीक क्षेत्राच्या जमिनीची आरोग्य पत्रीका १० नमुन्यांची सरासरी काढून तयार करावी. या आरोग्य पत्रीकेच्या आधारे प्रात्यक्षिकात समाविष्ट शेतकऱ्यांचे प्रशिक्षण घेवून प्रत्येक शेतकऱ्याला त्या क्षेत्रात पिकनिहाय खतांचा डोस काय असेल याची लेखी माहीती द्यावी. या क्षेत्रीतील १०० शेतकऱ्यांना प्रत्येकी १ एकर प्रमाणे आरोग्यपत्रीकेच्या आधारे १०० एकर क्षेत्रासाठी योजनेतून सुक्ष्म मुलद्रव्ये द्यावयाचे नियोजन करावे.

२) **माती परिक्षणावर आधारीत सुक्ष्ममुलद्रव्यांचा पुरवठा :** वर नमूद केल्याप्रमाणे जमिनीची आरोग्य पत्रीका तयार केल्यानंतर त्या क्षेत्रात कमी आढळलेल्या सुक्ष्म मुलद्रव्यांचा पुरवठा १०० एकरासाठी योजनेतून करावयाचा आहे. यासाठी खर्चाचा मापदंड एकरी रु. ४००/- ठेवण्यात आला आहे. याहून अधिक रक्कम लागल्यास लोकवाटा शेतकऱ्यांकडून घ्यावा. सुक्ष्म मुलद्रव्यांचा डोस लघुप्रकल्पातील पिकाच्या शीफारशी आणि आरोग्य पत्रीका यावर आधारीत असावा. परंतू सरसकट ग्रेड १ किंवा ग्रेड २ चे सुक्ष्म मुलद्रव्य न देता प्रत्यक्ष गरजेनुसार मुलद्रव्ये द्यावी उदाः झींक सल्फेट, मॅग्नेशियमसल्फेट, बोरॉन, फेरस सल्फेट इ.

३) **बीज प्रकिया :** लघु विस्तार प्रकल्पातील पिकासाठी शीफारस असलेले जीवाणू खत (अझो, रायझो, पी.एस.बी., ॲसीटोबॅक्टर इ.) आणि रोगप्रतिबंधक औषधी (बाविस्टीन, ट्रायकोडर्मा, सल्फर इ.) यांची बीजप्रक्रीया १०० एकरावर योजनेतून करावयाची आहे. या निविष्ठांची खरेदी वेळेवर होणे आवश्यक आहे म्हणून खरीपासाठी एप्रिल महिन्यात जिल्हास्तरावर दरपत्रके मागवून जागतिक बँकेच्या विहित शॉपिंग पध्दतीने पुरवठा आदेश द्यावेत. बीजप्रक्रियेबाबत शेतकऱ्यांना

प्रात्यक्षिक कृषिसहाय्यक यांनी दाखवावेत व त्यांचे फोटो ठेवावेत. योग्य दर्जाच्या निविष्ठांचा पुरवठा वेळेत होईल याकडे विशेष लक्ष कृषि पणन तज्ञ यांनी द्यावे.

४) **शिफारशीनुसार सापळा पिकाची लागवड :** यासाठी प्रतिएकर रु. २५/- प्रमाणे तरतूद आहे. संपूर्ण १०० एकरासाठी रु. २,५००/- इतकी तरतूद आहे. ही रक्कम संबंधीत कृषी सहाय्यकाला चेकने अग्रीमाच्या स्वरुपात द्यावी. पेरणीच्यावेळी सापळा पिकाचे बियाणे स्थानिकरीत्या खरेदी करुन त्याची पेरणी मुख्य पिकाच्या भोवताली करुन घेण्याची जबाबदारी कृषि सहाय्यकाची राहील. शिफारस केलेली सापळा पिके खालीलप्रमाणे आहेत.

| अ.क्र. | मुख्य पिक | सापळा पिक | कोणत्या किडीचा नियंत्रणासाठी |
|---|---|---|---|
| १. | कापूस | चवळी, मका, झेंडू, एरंडी, अंबाडी | रस शोषून घेणाऱ्या किडीसाठी |
| २. | सोयाबीन | एरंडी, ज्वारी, सुर्यफूल | तंबाखूवरील अळी स्पोडोप्टेरासाठी |
| ३. | ज्वारी | भेडी | खोडकिड्यासाठी |
| ४. | तूर | राळा | रस शोषून घेणाऱ्या किडीसाठी |

५) **बर्डचर्चेस :** पक्षी थांब्यासाठी लाकडी अँटेना अथवा उंच वाढणाऱ्या ज्वारीचे मिश्रपीक यासाठी प्रतिएकर रु. २५/- प्रमाणे १०० एकरासाठीचे रु. २५००/- कृषिसहाय्यकास चेकने अग्रीमाच्या स्वरुपात द्यावेत कृषि सहाय्यकांनी पेरणीच्यावेळी मुख्य पिकाता उंच वाढणारी ज्वारी, मका ही मिश्र पिके म्हणून घेतली पाहीजेत. मिश्रपिकांची धाटे मुख्य पिकाची काढणी होईपर्यत तशीच ठेवली पाहिजेत. जेणेकरुन त्यांचा वापार पक्षी थांबे म्हणून होईल. मिश्रपिक न घेतल्यास लाकडी अँटेना एकरी पाच प्रमाणे उभे करावेत.

६) **निमार्क किंवा ॲझाडीरेक्ट्रीनची फवारणी :** प्रात्यक्षिके आयोजित केलेल्या शेतकरी गटांनी सामुहीकरित्या निंबोळ्या गोळा करुन पाच टक्के निमार्क तयार करुन फवारणी केल्यास प्रतिशेतकरी रु.२००/- प्रमाणे अनुदान वितरीत करावे (निमार्क खरेदी करु नये). असे न झाल्यास ॲझाडीरेक्ट्रीन ३००० ppm शिफारशीनुसार खरेदी करुन शेतकऱ्यांना द्यावे.

७) **शेतकरी प्रशिक्षण :** इतर केंद्रपुरस्कृत योजनाप्रमाणे (उदा. एकात्मिक तृणधान्य, गळीतधान्य, कडधान्य इ.) या प्रकल्पासाठीही या प्रात्यक्षिकांचाच एक भाग म्हणून शेतकरी प्रशिक्षण आयोजीत करावी. शेतकरी प्रशिक्षणासाठी रु. ५,०००/- इतकी तरतूद आहे. शेतकरी प्रशिक्षणामध्ये लघु विस्तार प्रकल्पातील प्रगतीशील शेतकऱ्यांचा सहभाग असावा.

उपरोक्तप्रमाणे प्रात्यक्षिकांचे आयोजन करुन यांच्या नोंदी / फोटो, यशोगाथा कृषिपणन तज्ञ यांनी स्वतंत्र तयार करुन नोडल अधिकारी, पी.आय.यु (कृषि) कक्षास पाठविण्यात याव्यात.

**मा. आयुक्त (कृषि)**
**यांच्या मान्यतेने**

**संचालक**
**(विस्तार व प्रशिक्षण)**
**कृषि आयुक्तालय,**
**शिवाजी नगर, पुणे- ०५**